ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

*No: CGRF/AZ/AUR/ U / 231 / 2009 / 65                    Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M  Urban Circle ,  M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:-  Forwarding of grievance in respect  of  Smt. Mangala Wadekar*
*N-9, L Shop NO.1, Shivaji Nagar, Cidco Aurangabad.*
*(Consumer No. 490012193499)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect  of  Smt. Mangala Wadekar, N-9, L Shop NO.1, Shivaji Nagar, Cidco Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 21.07.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*
*Smt. Mangala Wadekar*
*N-9, L Shop NO.1, Shivaji Nagar,*
*Cidco,  Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३१/२००९/६५**

**तक्रार दाखल दिनांक :- ०८/०७/२००९**
**निकाल दिनांक :- ३१/०७/२००९**

**श्रीमती मंगला बाबुराव वाडेकर,**
**दुकान नंबर १, एन ९, एल.**
**शिवाजीनगर, सिडको,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१२१९३४९९) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०८/०७/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी महावितरतण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्याचे एन ९ सिडको येथील दुकान त्यांनी श्री हनुमंत देशमुख यांना भाड्याने दिले आहे.महावितरणतर्फे ऑक्टोबर २००८ पर्यंत देण्यात आलेल्या वीज बिलाचा भरणा त्यांनी केलेला आहे. पुढील काळाचे वीज बिल न भरल्यामुळे महावितरणतर्फे मार्च २००८ मध्ये त्यांचा वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला व एप्रिल २००८ मध्ये तो कायमस्वरुपी खंडीत करण्यात आला. त्यांनी महावितरणच्या संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडे थकबाकी रक्कम भरुन वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्याची विनंती केली. पण अनेकवेळा सपर्क साधुन देखील त्यांचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्यात आला नाही. अर्जदाराने वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्याबाबत तसेच या प्रकरणी योग्य न्याय देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २१/०७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री हनुमंत देशमुख उपस्थित होते.नोडल अधिकारी उपस्थित नव्हते त्यांच्यातर्फे सुनावणीची तारीख पुढे वाढवुन देण्याबाबचे विनंती पत्र मंचात दाखल करण्यात आले. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी २४/०७/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २४/०७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी म्हणुन हनुमंत देशमुख उपस्थित होते.महावितरणतर्फे नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणुन कनिष्ठ अभिंयता श्री वानखेडे उपस्थित होते. कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदाराने पुर्नजोडणी रक्कम भरली नसल्यामुळे वीज पुरवठा जोडणी करुन देण्यात आला नसल्याचे सांगितले. मंचाने त्यांना वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीसीबद्दल विचारले असता ती दिली नसल्याचे त्यांनी मान्य केले. मंचाने त्यांना अर्जदाराचा तात्पुरता व कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केल्याबाबतचा अहवाल व योग्य ती कागदपत्रे पुढील सुनावणीस दाखल करण्याचे सांगितले. अर्जदाराने वीज बिलाची थकबाकी भरुन बराच कालावधी झाला असल्याचे आढळुन आल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा २४ तासात पुर्नजोडणी करुन देण्याचा आदेश दिला या प्रकरणाची पुढील सुनावणी २८/०७/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक २८/०७/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.त्यांनी आपला जवाब मंचात दाखल केला.अर्जदार व नोडल अधिकारी यांचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

५) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्र वरुन तसेच मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन दुकानासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००१२१९३४९९ असा असुन मीटरचा क्रमांक ८०४०६२२६९४ असा आहे. अर्जदाराने सप्टेबर २००८ मध्ये वीज बिलाच्या रुपये ४६१८=४६/- थकबाकी पैकी रुपये २५००/- ही रक्कम २१/१०/२००८ रोजी भरली पण त्यानंतर वीज बिलाचा भरणा केला नसल्यामुळे दिनांक १८/०३/२००९ रोजी कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. फेब्रुवारी २००९ पर्यंत

अर्जदाराच्या नांवावर ५१३८=३५/- रुपये एवढी थकबाकी रक्कम असल्याचे सी.पी.एल.वरुन स्पष्ट होते.महावितरणतर्फे २६/०४/२००९ रोजी कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांचा विज पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आला.सी.पी.एल.चे निरीक्षण केल्यावर २६/०४/२००९ रोजी वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आल्यानंतर देखील मे २००९ व जुन २००९ या महीन्याची ६२ युनिट वीज वापराची नोंद करण्यात आलेली दिसुन येते. व वीज पुरवठा चालु असल्याची नोंद दर्शविण्यात आलेली आहे.कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदारास ५५००/- रुपयाचे थकबाकी रक्कमेचे देयक देतानांच सोबत पुर्णजोडणी रक्कमेचे देयक देणे गरजेचे होते. परंतु थकबाकीची रक्कम रुपये ५५००/- दिनांक २५/०६/२००९ रोजी भरणा करुन घेऊन व पुर्णजोडणी रक्कम न भरल्याचे कारण सांगुन ग्रहकास वीज पुरवठा पुर्णजोडणी करुन दिला नाही. याउलट अर्जदारास ०६/०७/२००९ रोजी पत्राद्वारे संयुक्त तपासणी पथकाच्या अहवालात आपले मीटर मंदगतीने चालत असल्याचे व तपासणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र दिले. अर्जदाराने थकबाकीची पुर्ण रक्कम भरल्यानंतर देखिल त्यांचा वीज पुरवठा पुर्नजोडणी न करता त्यांना वीज चोरीच्या प्रकरणात गुंतवण्याचा पर्यंत केलेला दिसुन येतो.दिनांक २५/०६/२००९ रोजी अर्जदाराने थकबाकी रक्कम भरल्यानंतर मंचाने दिनांक २४/०७/२००९ रोजी सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशा पर्यंत महावितरण कंपनीतर्फे वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्यात आला नसल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराचा वीज पुरवठा तात्पुरता व कायम स्वरुपी खंडीत करतांना त्यांना कोणतीही पुर्व सुचना/नोटीस देण्यात आली नसल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीची ही कृती वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उलंघन असल्याचे दिसुन येते.

अर्जदारातर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत त्यांना उपकार्यकारी अभियंता यांचे दिनांक ०६/०७/२००९ रोजी देण्यात आलेले पत्र सोबत जोडले आहे. यापत्राद्वारे संयुक्त तपासणी पथक, औरंगाबाद यांनी दिनांक ०६/०७/२००९ रोजी अर्जदाराच्या मीटरची स्थळ पाहणी केल्याचे सांगत अर्जदारास १०/०७/२००९ रोजी मीटर तपासणीसाठी पन्नालालनगर औरंगाबाद येथे उपस्थित राहण्याबाबत कळविले आहे.

नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या जवाबात अर्जदाराचा वीज पुरवठा वीज बिलाच्या थकबाकीपोटी १८/०३/२००९ रोजी तात्पुरता व २६/०४/२००९ रोजी कायमचा खंडीत केला असल्याचे म्हटले आहे.उपकार्यकारी अभियंता/कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदाराच्या मीटरची संयुक्त पथकाने दिनांक ०६/०७/२००९ रोजी पाहणी केल्यावर ते मंद गतीने चालत असल्याचे दिलेले पत्र हे अर्जदाराचा येथे वीज मीटर दिनांक २६/०४/२००९ रोजी कायम स्वरुपी काढण्यात आल्यानंतर दिले असल्याचे स्पष्ट होते.यावरुन अर्जदारास वीज चोरीच्या प्रकरणात अडकविण्याचा तसेच अर्जदारास हेतु पुरस्पर त्रास देण्याच्या हेतुने ही कारवाई संबंधीत अधिका-यांने केलेली असल्याचे मंचाचे मत आहे. मंच याप्रकरणी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करीत असुन याबाबत महावितरण कंपनीतर्फे संबंधीता विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी अपेक्षा व्यक्त करते व भविष्य काळात अशा प्रकाराची पुनरावृत्ती होणार नाही व ग्राहकांना देण्यात येण्या-या सेवेत सुधारणा करण्याबाबत आदेश देत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेल्या सेवेतील त्रुटीमुळे अर्जदाराचे आर्थीक नुकसान व मानसिक त्रास झाल्याचे स्पष्ट होते.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्य केलेल्या कृती व मानके (Standard of Performance) नुसार वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्यास विलंब केल्याबद्दल दंड आकारणी करणे योग्य ठरेल त्याचप्रमाणे हेतुपुरस्पर त्रास दिल्याबद्दल अर्जदार मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई मीळण्यास पात्र असल्याचे मंचाचे मत आहे.

अर्जदाराने दाखल केलेली तक्रार मान्य करण्यात येत असुन मंच याप्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेले एप्रिल २००९ ते जुन २००९ याकाळाचे वीज बिल रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्यात ४ आठवडे उशिर केल्यामुळे नियामक आयोगाच्या कृती मानकाप्रमाणे ४००/- रुपये नुकसान भरपाई द्यावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास मानसीक त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई ३० दिवसात द्यावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास सुधारीत वीज बिल ३० दिवसांत द्यावे त्यात व्याज व दंड आकारण्यात येवु नये व अर्जदाराने भरलेल्या रकमेची वजावट या सुधारीत वीज बिलातुन करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२३१/२००९/६५** **दिनांक :-**

**प्रति,**

श्रीमती मंगला बाबुराव वाडेकर,
दुकान नंबर १, एन ९, एल.
शिवाजीनगर, सिडको,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१२१९३४९९)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२३१/२००९/६५ )

आपण दिनांक ०८/०७/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.